# १५ मार्च - भारत बंद

१५-१६ नोव्हेंबर १९८७ रोजी हिन्द मजदूर किसान पंचायतच्या विशाखापट्टनम् येथे झालेल्या अधिवेशनांत राष्ट्रीय कार्यकारिणीने मंजूर केलेल्या आर्थिक व राजकीय ठरावाद्वारे "देश बचाव" सम्मेलनाची तयारी करण्याची हाक दिली होती. आणि सर्व राजकीय पक्ष व संबंधितांना देशातील ढासळत्या परिस्थितीबद्दल कल्पना देऊन भ्रष्टाचार व दिल्ली सरकार विरुध्द लढा देण्याचे आवाहन केले होते.

हिन्द मजदूर किसान पंचायतने केलेल्या आवाहनाला सर्वत्र चांगला प्रतिसाद मिळत आहे, ह्याबद्दल राष्ट्रीय कार्यकारिणीला अतिशय समाधान वाटते.

२८ डिसेंबरचा उत्तर प्रदेश आणि बिहार "बंद" अप्रतिमपणे यशस्वी झाला. बिहार बंद मधून सी.पी.आय., सी.पी.आय.[एम], लोकदल[अ], जनता पार्टी आणि उत्तर प्रदेशांत भा.ज.प. आणि लोकदल[अ] बाहेर राहून सुध्दा ह्या बंद मध्ये जे यश मिळाले त्या यशांत हिन्द मजदूर किसान पंचायतचा सिंहाचा वाटा आहे.

देशातील विरोधी पक्षानी १५ मार्च १९८८ रोजी "भारत बंद" ची हाक दिली आहे. त्याच प्रमाणे "भारत बचाव परिषद"हि बोलविलेली आहे. त्यांच्या ह्या निर्णयाचे हिंद मजदूर किसान पंचायतची राष्ट्रीय कार्यकारिणी स्वागत करीत असून त्यांच्या निर्णयाला सहमती व्यक्त करीत आहे.

केवळ लांचखाऊच नव्हे तर खोटारडा व स्वत:चा देश व देशापुढील प्रश्नांची जराहि काळजी नसलेला अशी ज्याची प्रतिमा निर्माण झालेली आहे अशा प्रधान मंत्र्याला आणि त्याच्या भ्रष्टाचाराने बरबटलेल्या लोकविरोधी सरकारला उलथून टाकण्यासाठी "भारत बंद" हे लोक चळवळीने उचललेले निर्णायक पाऊल आहे. स्वत:च्या इटालियन व अन्य परदेशी मित्र व नातेवाईक आणि भ्रष्टाचारी प्रकरणांत गुंतलेल्या व देश विरोधी कारवायांत हात असलेल्या इतर लोकांबरोबर लक्षद्विपची सरकारी खजिन्यातून कोटयावधी रुपयांचा खर्च करून केलेली सफर हे प्रधान मंत्र्याच्या चारित्र्याचे एक उदाहरण होय. श्री गांधीचे सरकार म्हणजे राष्ट्रीय आपत्ती आहे. तर विरोधी पक्षाची, हे सरकारउलथून टाकण्यासाठी, निर्णायक लढा देण्याबाबतची उदासिनता व बेफिकीरी ही त्याहूनहि कमी नसलेली शोकांतिका आहे.

हिन्द मजदूर किसान पंचायतने स्वत:च्या संपूर्ण ताकदोनिशी ह्या "भारत बंद" मध्ये स्वत:ला झोकून देण्याचा निर्णय घेतलेला आहे. सर्व औद्योगिक व्यवहार, रेल्वेसह सर्व वाहतूक, कोळशाच्या खाणीसह सर्व खाणी बँका, पोस्ट, दळणवळणाची सर्व साधने इत्यादिसह सर्व सरकारी व सार्वजनिक कार्यालये इ० चे व्यवहार ठप्प करणे, हे हा बंद यशस्वी करण्यासाठी आवश्यक आहे. हिन्द मजदूर किसान पंचायतने आपल्या अध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली "भारत बंद कृति समिती" ची स्थापना करीत आहे. आणि तत्सम अन्य कृति समित्या अथवा राजकीय आणि कामगार संघटना यांच्याशी संपर्क साधून व १५ मार्च चा बंद यशस्वी करून सर्व आर्थिक व्यवहार ठप्प करण्यासाठी आणि त्यानंतरच्या कामाची दिशा ठरविण्यासाठी सर्व अधिकार कार्यकारिणी ह्या कमिटीला देत आहे.

लोकांचा ह्या चळवळीला पाठींबा मिळविणे आणि विशाखापट्टनम् अधिवेशनांत मंजूर झालेल्या आर्थिक व राजकीय ठरावातील १८ कलमी कार्यक्रमावर जनतेत चर्चा घडवून आणणे व श्रीलंकेतील भारतीय सैन्य परत बोलविणे ह्यासाठी "भारत बंद" च्या हाकेचा हिंमकिंपं उपयोग करील. १८ कलमी कार्यक्रमानुसार आंदोलन व भारतीय शांती सेनेचे लष्कर परत बोलविणे ह्यासाठी हिंमकिंपं आयोजित ११ ते १७ फेब्रुवारी ह्या सप्ताहाचा १५ मार्च च्या "भारत बंद" ला जनतेचा पाठींबा मिळावा, ह्यासाठी उपयोग केला जाईल.

..00..